प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.

पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

यांना सविनय सादर

**प्रतिवेदक** :- एस. वाय. राजगुरू सहा. पोलीस निरीक्षक, चंदननगर पोलीस ठाणे, पुणे शहर.

यांजकडुन विनंती पुर्वक की,

**विषय-** पळवून नेलेले अल्पवयीन मुलीची माहिती सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्द होणेबाबत.

वरील विषयान्वये सादर करतो की, चंदननगर पोलिस स्टेशन गुन्हा रजि. नं. २६९/२०१८ भा. द. वि. कलम ३६३ मधील फिर्यादी नामे- सौ सिता रघुनाथ हिंगमिरे वय ४० वर्षे, रा. शंकरनगर, गल्ली नं.९, कटके यांचे खोलीत, चंदननगर, पुणे यांची अल्पवयीन मुलगी- कु. मयुरी रघुनाथ हिंगमिरे वय १६ वर्षे, रा. सदर हिस दि. २१/१०/२०१८ रोजी १८/४५ वा. चे सुमारास रहाते घरापासून आरोपी नामे- मुकेश उर्फ आप्पा अंबादास येडगे वय २४ वर्षे, रा. सर्व्हे नं. ३८/२, गल्ली नं. ९, शंकरनगर, खराडी पुणे याने कशाचे तरी आमिष दाखवून, फुस लावून फिर्यादीचे संमतीशिवाय कायदेशीर रखवालीतून पळवून नेले आहे. पळवून नेलेले अल्पवयीन मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे.



कु. मयुरी रघुनाथ हिंगमिरे वय १६ वर्षे, अंगाने सडपातळ, उंची ५ फुट, चेहरा गोल, रंगाने गोरी, नाक बसके, केस मध्यम व एक वेणी घालते, नाकात सानिया मिर्झा, कानात सोन्याचे धडकन, पायात चांदीच्या पटटया, अंगात पोपटी कलरचा कुर्ता व त्यावर फुलांची डिझाईन असलेला राखाडी कलरचा पायजमा व ओढणी, डावे हातात मनगटी घडयाळ, पायात काळी चप्पल, डावे पायाचे गुडघ्या जवळ काळसर व्रण, शिक्षण ११ वी कॉमर्स, मराठी भाषा बोलते.

वरील वर्णनाचे अल्पवयीन मुलीस वर नमूद केले तारखेस, वेळी व ठिकाणावरून आरोपी मजकूर याने कशाचे तरी आमिष दाखवून फुस लावून फिर्यादीचे संमतीशिवाय कायदेशीर रखवालीतून पळवून नेले आहे.

तरी पळवून नेलेले अल्पवयीन मुलीचे तपासकामी सदर मुलीची माहिती सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्द होणेस विनंती आहे.